# जिल्हा परिषद,अमरावती

## सामान्य प्रशासन विभाग, कॅम्प परिसर अमरावती ४४४६०२

दुरध्वनी क्रमांक ०७२१२६६२०१२ Email ID: dyceogadzpamt@gmail.com

**क्रमांक/जिपअ/साप्रवि/आस्था-१/ १७७२ /२०२६** **दिनांक ०८ मे,२०२६**

**अंत्यत महत्वाचे /कालमर्यादा**

**बदली प्रक्रीया - २०२६ सत्रातील सर्वसाधारण बदल्या**

**प्रति,**

१) --------------------------------- (सर्व) खातेप्रमुख
जिल्हा परिषद, अमरावती

२) गट विकास अधिकारी,
पंचायत समिती ----------------------- (सर्व)

**विषय:- सर्वसाधारण बदली प्रक्रीया-२०२६ करिता जिल्हा स्तरावरील समुपदेशन प्रक्रीयेची तारीख व प्राधान्यक्रम कळविण्याबाबत.**

**संदर्भ:-** १) शासन निर्णय क्रमांक :-जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दिनांक १५ मे २०१४.
२) मा.मु.का.अ यांचे कडुन मान्य टिपणी दिनांक ०५ मे, २०२६.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये जिल्हा स्तरावरील सर्वसाधारण बदली प्रक्रीया-२०२६ समुपदेशन प्रक्रीयेने राबवायची असल्यामुळे जिल्हा स्तरावरील बदली प्रक्रीयेचे वेळापत्रक कळविण्यात येत आहे. त्याप्रमाणे दिनांक ९ मे, २०२६ ते दिनांक १० मे, २०२६ या कालावधीमध्ये जिल्हास्तरावरील (महिला व बालविकास विभाग, पशुसंवर्धन विभाग, वित्त विभाग, कृषी विभाग, आरोग्य विभाग) विभागांच्या प्रशासकीय/विनंती/आपसी बदल्याचे समुपदेशन घेण्याबाबत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांचे कडून वेळापत्रक व प्राधान्यक्रम निश्चीतीस मान्यता प्राप्त आहे.

त्याअनुषंगाने दिनांक **०९ मे, २०२६ ते दिनांक १० मे, २०२६** या कालावधीमध्ये जिल्हास्तरावरील प्रशासकीय/विनंती/आपसी बदली प्रक्रीयेचे समुपदेशन सोबत दिलेल्या वेळापत्रकानुसार सकाळी १०.०० वाजता पासुन डॉ.पंजाबराव देशमुख सभागृह जि.प.अमरावती. येथे घेण्यात येईल. याबाबीची नोंद घेण्यात यावी. तसेच ज्या विभागाची समुपदेशन प्रक्रीया ज्या तारखेला आहे त्यांनी संगणक संचासह रिक्त पदाच्या अचूक अहवालासह सदरहू प्रक्रीयेच्या कामाकरीता नेमलेल्या अधिकारी /कर्मचारी यांचे सह दिलेल्या तारखेला व वेळेला हजर राहावे. तसेच सर्व कार्यालय प्रमुख यांनी सदरहू बदलीस पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांना प्रक्रीयेस दिलेल्या दिनांकास सदरहू स्थळी हजर राहण्याकरीता आपल्यास्तरावरुन सुध्दा लेखी कळविण्यात यावे. व त्या बाबीची नोंद लेखी स्वरुपात ठेवावी. सदरहू प्रक्रीयेला आस्थापना सहाय्यक, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सहाय्यक प्रशासन अधिकारी यांनी अद्यावत स्वरुपातील रिक्त पदाचा अहवाल सोबत ठेवावा समुपदेशन प्रक्रीयेवेळी दर्शविण्यात येणारी रिक्त पदे ही बरोबर दर्शविण्यात येत आहे किंवा नाही यावर प्रक्रीया सुलभ होण्याच्या दृष्टीने लक्ष केंद्रीत करावे. व वेळीच निर्दशनास आनावे.

**(मुळ टिपणी मा.मु.का.अ यांचे कडून मंजूर)**

**सहपत्र:- वेळापत्रक व प्राधान्यक्रम**

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
**जिल्हा परिषद अमरावती**

**प्रतिलिपी,**

१. मा.विभागीय आयुक्त,अमरावती विभाग अमरावती यांना माहिती करिता सविनय सादर.
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांना माहिती करिता सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner

# जिल्हा परिषद अमरावती

## सर्व साधारण बदली प्रक्रीया-२०२६ करिता खालील कार्यालयास समुपदेशनाने स्थानांतर करावयाच्या तारखेबाबत वेळापत्रक

(ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रमांक: जिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दिनांक १५ मे, २०१४ अन्वये वेळापत्रक)

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | दि. ९ मे, २०२६ ते १० मे, २०२६ | बदलीचा प्रकार | समुपदेशनाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | महिला व बाल विकास विभाग | ९ मे २०२६ | प्रशासकीय विनंती/आपसी | डॉ.पंजाबराव देशमुख सभागृह जिल्हा परिषद, अमरावती |
| | पशु संवर्धन विभाग | | | |
| | वित्त विभाग | | | |
| | कृषी विभाग | | | |
| २ | आरोग्य विभाग (आरोग्य सेवक पुरुष/ आरोग्य सहायक पुरुष | ९ मे २०२६ | | |
| ३ | आरोग्य विभाग (आरोग्य सेवक पुरुष/ आरोग्य सहायक पुरुष सोडून ईतर सर्व संवर्ग | १० मे २०२६ | | |

वेळ सकाळी १०.०० वाजता पासुन

सत्यम गांधी, (भाप्रसे)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,अमरावती**

Scanned with OKEN Scanner

## प्राधान्यक्रम

शासन निर्णय १५ मे २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक दिनांक ०२ जानेवारी २०१७ शासन पुरकपत्र दि.०७ मार्च,२०१९ तसेच शासन शुध्दीपत्रक दि.०८ मार्च,२०१९ नुसार खालील प्रमाणे कर्मचा-यांना समुपदेशनास बोलवावे लागेल.

१) **आदिवासी भागातील प्रशासकिय बदलीपात्र कर्मचारी** :- १) पक्षघाताने आजारी कर्मचारी २) हदय शस्त्रक्रिया झालेले कर्मचारी ३) किडनी आजारी कर्मचारी ४) कॅन्सरने (कर्करोग) आजारी कर्मचारी ५) सैनिक व अर्धसैनिक जवानाच्या पत्नी / विधवा ६) कुमारीका कर्मचारी,७) स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा/मुलगी/नातु/नात (स्वातंत्र्य सैनिक हयात असेपर्यंत)

२) **गैर आदिवासी भागातील** :- १) पक्षघाताने आजारी कर्मचारी २) हदय शस्त्रक्रिया झालेले कर्मचारी ३) किडनी आजारी कर्मचारी ४) कॅन्सरने (कर्करोग) आजारी कर्मचारी ५) सैनिक व अर्धसैनिक जवानाच्या पत्नी / विधवा ६) कुमारीका कर्मचारी,७) स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा/मुलगी/नातु/नात (स्वातंत्र्य सैनिक हयात असेपर्यंत)

३) **आदिवासी भागातील किमान तिन वर्ष सलग सेवा (रजा कालावधी वगळून) झालेले सेवा ज्येष्ठ कर्मचारी** :-

४) **आदिवासी भागात विनंती वरुन जाणा-या कर्मचारी** :-

५) **विनंती बदल्या** :- १) मेंदुचा आजार असलेले कर्मचारी व थेलिसेमिया विकारग्रस्त मुलांचे पालक/जन्मजात गुणसुत्राचे दोषामुळे उद्‌भवणारे आजार (उदा Methlymalonik Academia (Mma) Classical Type (Mutase Defiency व इतर आजार), पक्षघाताने आजारी कर्मचारी २) दिव्यांग कर्मचारी /मतिमंद मुलांचे पालक व दिव्यांग मुलांचे पालक ३) हदय शस्त्रक्रिया झालेले कर्मचारी ४) जन्मापासून एकच (किडनी)असलेले कर्मचारी ५) कॅन्सरने (कर्करोग) आजारी कर्मचारी ६) **आजी/माजी** सैनिक व अर्धसैनिक जवानाच्या पत्नी / विधवा ७) विधवा कर्मचारी ८) कुमारीका कर्मचारी ९) परितक्त्या / घटस्फोटीत महिला कर्मचारी १०) वयाची ५३ वर्ष पूर्ण केलेले कर्मचारी (विनंती केल्यास) ११) पती-पत्नी एकत्रिकरण १२) स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा/मुलगी/नातु/नात (स्वातंत्र्य सैनिक हयात असेपर्यंत)

६) **गैर आदिवासी भागातील प्रशासकीय बदली पात्र कर्मचारी (पती-पत्नी एकत्रीकरणासह) प्रथम महिला कर्मचारी व त्यानंतर इतर कर्मचारी** :-

७) **विनंती बदल्या इतर कर्मचारी**

८) **आपसी बदली**

जिल्हा परिषद अमरावती

**सत्यम गांधी,(भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,अमरावती**

Scanned with OKEN Scanner